# केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा कलम १९ (१) अन्वये

प्रति,
**मा. माहिती अधिकारी,**
**मा. आयुक्त साहेब**
मिरा-भाईंदर महानगरपालिका
भाईंदर पश्चिम, ता. व जि. ठाणे-४०११०१.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | **श्री. नंदकिशोर वामन दळवी** |
| २) | अर्जदराचा पूर्ण पत्ता | : | बी-१०१, रोझ गार्डन सोसायटी, पांडुरंगवाडी, सिध्दीविनायक नगर जवळ, मिरा रोड (पूर्व), जिल्हा - ठाणे - ४०११०७. |

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : पांडुरंगवाडी येथे जया पार्क बिल्डींगच्या बाजुला व रोझ गार्डन सोसायटीच्या (सर्व्हे नं. १३१/२,५,७) आवाराच्या भिंतीला लागुन ताडाच्या झाडांच्या परिसरात (जया पार्क सोसायटी ते हरी ओम सोसायटीच्या मुख्य रस्त्याला लागुन) नोव्हेंबर १७ ते जाने १८ या तिन महिन्यात तिन गाळे अनाधिकृत बांधकाम आले होते. सदर गाळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने अतिक्रमण विभागाने जमिनदोस्त केले. मात्र एक गाळा अजुनही अस्तित्वात असुन त्यावर तोडफोडीची कारवाई झालेली नाही. सदर अनाधिकृत बांधकाम जमिनदोस्त करण्याचा निर्णय घेताना विचारात घेतलेल्या सर्व कागदपत्रांची एक प्रत माहितीसाठी देण्यात यावी.

(एक) माहितीचा विषय : वरील प्रमाणे

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी : ऑक्ट. २०१७ ते फेब्रु २०१८

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :

वर नमुद तिनही गाळे तोडताना विचारात घेतलेल्या सर्व कागदपत्रांची एक प्रत माहिती दाखल देण्यात यावी. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या एका गाळयावर कारवाई न झाल्याने सदर बांधकाम अधिकृत की अनाधिकृत आहे ते सदर बांधकामाच्या सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर सह कळविण्यात यावे.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिश: आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपालं खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ठ केला जाईल) : ~~टपालाद्वारे हवी~~

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) : माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे हवी ✓

(सहा) ज्यासाठी महिती आवश्यक आहे ते : सर्वोच्चय न्यायालयाच्या आदेशानुसार रोझ गार्डन सोसायटीची जमिन (क्षेत्रफळ) मुख्य प्रवर्तकाकडून (विकासकाकडून) हस्तांतरीत करून घेण्यासाठी सदर माहिती आवश्यक आहे.

ठिकाणी : मीरा रोड
दिनांक : 09 / 08 / 2018

(नंदकिशोर दळवी)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रभाग समिती कार्यालय क्र. ०६

राष्ट्र संत आचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरीजी (भवन), राम नगर,
शांती गार्डन, सेक्टर नं. ०५, मिरारोड (पूर्व), ता.जि. ठाणे ४०११०७.

जा. क्र. मनपा/प्र.क्र.०६/ 8394 /२०१८-१९ दिनांक : 23/ /२०१८

प्रति,
श्री. नंदकिशोर वामन दळवी
बी-१०१, रोझ गार्डन सोसायटी,
पांडुरंगवाडी, सिध्दीविनायक नगर जवळ,
मिरा रोड (पू).

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (वेस्ट)

विषय :- माहितीचा अधिकार २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत.
संदर्भ :- आपले दि. ०१/०८/२०१८ रोजीचे पत्र.

महोदय,

वरील विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्राद्वारे आपण पांडुरंगवाडी येथील जया पार्क बिल्डींगच्या बाजुला असलेल्या ३ गाळ्या अनधिकृत बांधकामावर कारवाई झाल्यासंबंधी तसेच अतिरिक्त १ गाळ्यावर कार्यवाही झाली नसल्याबाबत व बांधकाम जमिन दोस्त करण्याचा निर्णय घेताना विचारात घेतलेल्या सर्व कागदपत्राची माहिती मिळणेकरीता अर्ज सादर केलेला आहे. प्रभाग कार्यालया क्र. ०६ या कार्यालयाचे अभिलेख तपासले असता सदर जागेवर झालेल्या तोडक कारवाई संबंधी विचारात घेतलेल्या कागदपत्रांची संख्या निरंक आहे.

सदर माहितीने आपले समाधान झाले नसल्यास आपण मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त, अतिक्रमण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका चौथा मजला मुख्य कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे – ४०१ १०१ मिरा भाईंदर महानगरपालिका येथे आपण तीस दिवसाच्या आत प्रथम अपिल दाखल करु शकता.

EM221032772IN IVR:6977221032772
SP KASARVADAVALI S.O <400615>
Counter No:1,25/08/2018,10:39
To:NAND,KISHIOR
PIN:401107, Mira Road S.O
From:PRABHAG,SAMITI
Wt:20gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 1800 266 6868>

जन माहिती अधिकारी तथा
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र. ०६
मिरा भाईंदर महानगरपालिका